# सीमाभागातील विद्यार्थी शैक्षणिक संकुलाबाबत मुख्यमंत्र्यांसमवेत चर्चा

■ लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : सीमाभागातील विद्यार्थ्यांसाठी शिवाजी विद्यापीठाअंतर्गत सुरू केल्या जाणाऱ्या शैक्षणिक संकुलाबाबत मंगळवारी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासमवेत मुंबईत चर्चा झाली.

गेल्या तीन दिवसांपूर्वी उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत हे कोल्हापूर दौऱ्यावर आले होते. त्यावेळी त्यांनी सीमाभागातील या संकुलाची सुरुवात करण्यासाठी त्याची राज्याच्या बृहत आराखड्यामध्ये नोंद करण्याबाबत मुंबईत बैठक होणार असल्याचे सांगितले होते. त्यानुसार महाराष्ट्र राज्य उच्चशिक्षण व विकास आयोगाची बैठक मुख्यमंत्री ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृहामध्ये झाली.

या संकुलाची बृहत आराखड्यामध्ये नोंद करण्याबाबत चर्चा करण्यात आली. यावेळी मंत्री सामंत, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे अधिकारी, आदी उपस्थित होते. दरम्यान, या बृहत आराखड्यामध्ये नोंद झाल्यानंतर शैक्षणिक संकुलाबाबतच्या पुढील कार्यवाहीला गती मिळणार आहे.

# शिवाजी विद्यापीठाच्या तेरा अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

## अंतिम वर्षाच्या ८१७ विद्यार्थ्यांनी दिली परीक्षा

■ लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे सुरू असलेल्या अंतिम वर्षाच्या अंतिम सत्रातील विविध परीक्षा ८१७ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने दिल्या, तर दिवसभरात एकूण १३ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले.



शिवाजी विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राच्या परीक्षा मंगळवार, दि. २७ ऑक्टोबरपासून ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने सुरू आहेत. मंगळवारी पहिल्या सत्रामध्ये एम.बी.ए., एम. आर. एस. आणि एम. बी. ए. - रुलर मॅनेजमेंट या अभ्यासक्रमांच्या, तर दुसऱ्या सत्रामध्ये एम.बी.ए. (एक्झिक्युटिव्ह डिस्टन्स मोड), एम.बी.ए., एम.एस्सी, बी.ए. या अभ्यासक्रमांच्या परीक्षा पार पडल्या, तर तिसऱ्या सत्रात एम. ए.च्या परीक्षा विनाव्यत्यय पार पडल्या.

८३४ विद्यार्थ्यांपैकी ८१७ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने परीक्षा दिली. दिवसभरात डिप्लोमा इन कॉम्प्युटर प्रोग्राम, डिप्लोमा इन बिझनेस मॅनेजमेंट, सर्टिफिकेट कोर्स ईन पोर्टगेस, पीजी डिप्लोमा इन टुरिझम अँड ट्रॅव्हल, पीजी डिप्लोमा इन ह्युमन राईटस, पीजी डिप्लोमा इन कम्युनल हारमोनी अँड सोशल पीस, डिप्लोमा इन इन्स्ट्रुमेंटल म्युझिक, एम. ए. - योगा, एम. ए. - होम सायन्स, एम. एस्सी - टेक, एम. एस्सी कॉम्प्युटर सायन्स, पी. जी. डिप्लोमा इन डॉ. बी. आर. आंबेडकर थॉटस, सर्टिफिकेट कोर्स इन इंडियन कॉन्स्टिट्युशन या पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमांचे निकाल विद्यापीठ प्रशासनाने जाहीर केले.

दरम्यान, कोरोनाच्या काळात आवश्यक ती काळजी घेऊन विद्यापीठ परीक्षा घेत आहे.

# शिवाजी विद्यापीठच्या १३ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठातर्फे सुरू असणाऱ्या अंतिम वर्षांच्या अंतिम सत्रातील परीक्षांमध्ये शनिवार, दि. ७ नोव्हेंबर रोजी ८१७ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने परीक्षा दिली. एकूण १३ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले.

मंगळवारी पहिल्या सत्रामध्ये एम.बी.ए., एम.आर.एस. आणि एम.बी.ए- रूरल मॅनेजमेंट या अभ्यासक्रमांच्या तर दुसऱ्या सत्रामध्ये एम.बी.ए. (एक्झिक्युटिव्ह डिस्टंस मोड), एम.बी.ए. एम. एससी, बीए या अभ्यासक्रमांच्या परीक्षा पार पडल्या. तिसऱ्या सत्रात एम.ए. च्या परीक्षा विनाव्यत्यय पार पडल्या. ८३४ विद्यार्थ्यांपैकी ८१७ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने परीक्षा दिली. दिवसभरात डिप्लोमा



इन कॉम्प्युटर प्रोग्राम, डिप्लोमा इन बिझनेस मॅनेजमेंट, सर्टीफिकेट कोर्स इन पॉटगेस, पीजी डिप्लोमा इन टुरिझम अँड ट्रॅव्हल, पीजी डिप्लोमा इन ह्युमन राईटस्, पीजी डिप्लोमा इन कम्यूनल हारमोनी अँड सोशल पीस, डिप्लोमा इन इंस्ट्रूमेंटर म्युझिक, एम.ए- योगा, एम. ए- होम सायन्स, एम. एस्सी-टेक, एम एस्सी कॉम्प्युटर सायन्स, पी. जी. डिप्लोमा इन डॉ. बी. आर. आंबेडकर थॉटस, सर्टीफिकेट कोर्स इन इंडियन कॉन्स्टिटयुशन या पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमांचा निकाल घोषित करण्यात आला.

# एम.एस्सी., इतर अभ्यासक्रम प्रथम वर्षाच्या प्रवेश परीक्षांना १९ नोव्हेंबरपासून प्रारंभ

## तांत्रिक कारणांमुळे वेळापत्रकात बदल

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या एम.एस्सी. व तत्सम अभ्यासक्रम प्रथम वर्षाच्या प्रवेश परीक्षांच्या वेळापत्रकात बदल करण्यात आला आहे. या अभ्यासक्रमांच्या ऑफलाईन प्रवेश परीक्षा 'ओएमआर' पद्धतीने दि. १९ ते दि. २२ नोव्हेंबर या कालावधीत घेण्यात येणार आहेत.

विद्यापीठाच्या वतीने २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षातील विद्यापीठ अधिविभागात व संलग्नित महाविद्यालयात शिकवल्या जाणाऱ्या एम.एस्सी. व तत्सम अभ्यासक्रम प्रथम वर्षाची प्रवेश परीक्षा दि. ७ ते दि. १२ नोव्हेंबर दरम्यान ऑफलाईन पद्धतीने आयोजित करण्यात आली होती. परंतु, काही कारणास्तव वेळापत्रकात बदल करण्यात आला



आहे. दि. १९पासून या परीक्षा घेतल्या जाणार आहेत. तथापि, बी.एस्सी., एम.एस्सी., नॅनोसायन्स भाग-१ (इंटिग्रेटेड) व एम.एस्सी. नॅनोसायन्स भाग-१ या अभ्यासक्रमाची ऑफलाईन प्रवेश परीक्षा दि. १० रोजी ओ.एम.आर. पद्धतीने घेण्यात येणार आहे. याबाबतची अधिकची माहिती http://www.unishivaji.ac.in/mscadmission/admission-२०२० या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल, असे विद्यापीठाच्या वतीने कळविण्यात आले आहे.

# एम.एस्सी.च्या प्रवेश परीक्षेच्या वेळेत बदल

कोल्हापूर : अधिविभागात व संलग्नित महाविद्यालयात शिकविल्या जाणाऱ्या एम. एस्सी. व तत्सम अभ्यासक्रम प्रथम वर्षाच्या प्रवेश परीक्षा वेळेत बदल करण्यात आला आहे. ही परीक्षा ७ ते दि. १२ नोव्हेंबर या दरम्यान ऑफलाईन पद्धतीने आयोजित करण्यात येणार होती. त्याऐवजी आता ही परीक्षा दि. १९ ते दि. २२ नोव्हेंबर दरम्यान आयोजित करण्यात येणार आहे. तथापि बी. एस्सी., एम.एस्सी., नॅनोसायन्स भाग १ (इंटिग्रेटेड) व एम. एस्सी., नॅनोसायन्स भाग १ ची ऑफलाईन प्रवेश परीक्षा मंगळवारी (दि. १०) ओएमआर पद्धतीने होईल.

# विद्यापीठात आज राष्ट्रीय वेबिनार

कोल्हापूर : पब्लिक रिलेशन्स कौन्सिल ऑफ इंडियाच्या (पीआरसीआय) कोल्हापूर चॅप्टरतर्फे 'समाज माध्यमांच्या प्रस्फोटात जनसंपर्काच्या न्यू नॉर्मल्सची निश्चिती' या महत्त्वपूर्ण विषयावर आज, रविवारी ११ वाजता एकदिवसीय राष्ट्रीय वेबिनार होत आहे. जगन्नाथ पाटील या विषयावर बीजभाषण करतील. चॅप्टरचे अध्यक्ष राजेश शिंदे यांनी ही माहिती दिली. उद्‌घाटन पीआरसीआयचे संस्थापक अध्यक्ष एम. बी. जयराम यांच्या हस्ते होईल. वेबिनारमध्ये 'कृत्रिम बुद्धिमत्ता : जनसंपर्क क्षेत्रासाठी वरदान की धोका?' या विषयावर परिसंवाद होणार आहे.

# शिवाजी विद्यापीठात आज राष्ट्रीय वेबिनार

## डॉ. पाटील, डॉ. आर. के. कामत यांचे मार्गदर्शन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

पब्लिक रिलेशन्स कौन्सिल ऑफ इंडियाच्या (पीआरसीआय) कोल्हापूर चॅप्टरतर्फे 'समाज माध्यमांच्या प्रस्फोटात जनसंपर्काच्या न्यू नॉर्मल्सची निश्चिती' या महत्त्वपूर्ण विषयावर रविवारी दि. ८ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता एकदिवसीय राष्ट्रीय वेबिनारचे आयोजन केले आहे. शिक्षणतज्ज्ञ डॉ. जगन्नाथ पाटील या विषयावर बीजभाषण करतील. चॅप्टरचे अध्यक्ष राजेश शिंदे यांनी ही माहिती दिली.

या वेबिनारचे उद्घाटन पीआरसीआयचे संस्थापक अध्यक्ष एम. बी. जयराम यांच्या हस्ते होईल. वेबिनारमध्ये 'कृत्रिम बुद्धिमत्ता : जनसंपर्क क्षेत्रासाठी वरदान की धोका?' या विषयावर परिसंवाद होणार आहे. शिवाजी विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत या विषयावर प्रकाश टाकतील. परिषदेस पीआरसीआयचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. टी. विनय कुमार, वरिष्ठ उपाध्यक्ष के. रविंद्रन, सरचिटणीस यू. एस. कुट्टी, पीआरसीआय-यंग कम्युनिकेटर्स क्लबच्या अध्यक्ष गीता शंकर यांच्यासह देशभरातील पीआरसीआयच्या विविध चॅप्टरचे प्रमुख व सदस्य उपस्थित राहणार आहेत. या वेबिनारचे पीआरसीआय कोल्हापूर या फेसबुक पेजवर लाइव्ह प्रसारण करण्यात येणार आहे.

# जनसंपर्कविषयक न्यू नॉर्मल्सची निश्चिती आज राष्ट्रीय वेबिनार

**कोल्हापूर :** पब्लिक रिलेशन्स कौन्सिल ऑफ इंडियाच्या (पीआरसीआय) कोल्हापूर चॅप्टरतर्फे 'समाजमाध्यमांच्या प्रस्फोटात जनसंपर्काच्या न्यू नॉर्मल्सची निश्चिती' या विषयावर रविवारी (ता. ८) सकाळी अकराला राष्ट्रीय वेबिनारचे आयोजन केले आहे. आंतरराष्ट्रीय ख्यातीचे माध्यम व शिक्षणतज्ज्ञ डॉ. जगन्नाथ पाटील या विषयावर बीजभाषण करतील. पीआरसीआय- कोल्हापूर चॅप्टरचे अध्यक्ष राजेश शिंदे यांनी ही माहिती दिली. 'पीआरसीआय'चे संस्थापक अध्यक्ष एम. बी. जयराम यांच्या हस्ते उद्घाटन होईल. या वेबिनारचे 'पीआरसीआय कोल्हापूर' या फेसबुक पेजवर लाइव्ह प्रसारण करण्यात येणार आहे.